aglasem.com

FOR MH NMMS EXAM PREPARATION

MH NMMS 2025 Question Paper · SAT

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
MH NMMS	2025	Question Paper	SAT

NATIONAL MEANS CUM MERIT SCHOLARSHIP
SCHEME EXAMINATION, 2025-26
राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी
शिष्यवृत्ती योजना परीक्षा २०२५–२६

संच **A**

CENTRE CODE केंद्र सांकेतांक				

SEAT NO. आसन क्रमांक													

QUESTION BOOKLET
प्रश्नपुस्तिका

SCHOLASTIC APTITUDE TEST
शालेय क्षमता चाचणी

CLASS VIII / इयत्ता ८ वी

MEDIUM : ENGLISH WITH MARATHI (मराठी) VERSION

[DATE: 28th December, 2025]

[दिनांक : २८ डिसेंबर, २०२५]

[Time : 13:30 P.M. to 15:00 P.M.]

[वेळ : दुपारी १३:३० ते दुपारी १५:००]

Maximum Marks : 90
एकूण गुण : ९०

Time : 90 Minutes
वेळ : ९० मिनिटे

Total Pages : 48
एकूण पाने : ४८

INSTRUCTIONS TO CANDIDATES

Read the following instructions carefully before you answer the questions.

1. Answers are to be bubbled only on the separate carbonless Answer sheet provided to you. After examination detach the carbonless copy from original Answer sheet & keep carbonless copy with you till the declaration of result.

2. Please write your Center Code & Seat No. very clearly (only one digit in one block) on question paper. Before writing your seat no. ascertain it with Hall ticket. Please see that no block is left blank or unfilled.

   Example :

CENTRE CODE	1	1	0	2

SEAT NO.	M	3	3	9	2	6	1	1	0	2	1	2	3

3. Please ensure that you have received Scholastic Aptitude Test answer sheet.

4. Total number of questions are 90 for this paper. All questions carry one mark each.

5. All questions are compulsory.

6. For each question there are four options given in question paper. Check for the correct answer and bubble correct option from four circles given in answer sheet by Black/Blue pen. Please do not write any answers on question paper.

7. Start answering from first question one after another till the last question.

8. If you do not know the answer of any question, do not spend much time on it and pass on to the next one. If time permits, you can come back to the questions which you have left in the first instance and try them again.

9. Utilize the allotted time for solving the questions in best possible way. The rough work is to be done in the box given under each page.

10. Do not write anything except Center Code, Seat No. and rough work anywhere in this booklet

परीक्षार्थींसाठी सूचना

प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी पुढील सूचना काळजीपूर्वक वाचा.

१. उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र कार्बनलेस उत्तरपत्रिका देण्यात आलेली आहे. त्यावरच आपली उत्तरे नोंदवावीत. परीक्षेची वेळ संपल्यानंतर ही कार्बनलेस प्रत मूळ उत्तरपत्रिकेपासून वेगळी करून परीक्षेच्या निकालापर्यंत स्वत:कडे जतन करून ठेवावी.

२. तुमचा केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक प्रश्नपत्रिकेच्या मुखपृष्ठावर दिलेल्या विहित ठिकाणी सुस्पष्टपणे लिहावा. (एका चौकटीत एकच अंक याप्रमाणे) स्वत:चा आसन क्रमांक लिहिण्यापूर्वी प्रवेशपत्रानुसार तो बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी. कोणताही रकाना रिक्त राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

उदाहरणार्थ :

CENTRE CODE केंद्र संकेतांक	१	१	०	२

SEAT NO. आसन क्रमांक	M	३	३	९	२	६	१	१	०	२	१	२	३

३. तुम्हाला उत्तरे नोंदविण्यासाठी शालेय क्षमता चाचणी (Scholastic Aptitude Test) चीच उत्तरपत्रिका मिळाली आहे याची खात्री करावी.

४. सदर विषयासाठी ९० प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे.

५. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

६. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी प्रश्नपुस्तिकेमध्ये चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी तुम्हाला योग्य वाटेल त्या पर्यायाचा क्रमांक पहा व त्या क्रमांकाचे वर्तुळ काळ्या किंवा निळ्या बॉलपेनने रंगवून उत्तर नोंदवा. मात्र हे काम तुमच्या उत्तरपत्रिकेवर योग्य प्रश्नापुढे करावयाचे आहे प्रश्नपुस्तिकेवर नाही.


७. पहिल्या प्रश्नापासून सुरुवात करून एकामागून एक प्रश्न सोडवीत शेवटपर्यंत प्रश्न सोडवावेत.


८. एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर त्यावर जास्त वेळ घालवू नका. पुढचे प्रश्न सोडविण्यास घ्या. सर्व प्रश्न सोडवून झाल्यावर उरलेल्या वेळात राहून गेलेल्या प्रश्नांवर तुम्हाला पुन्हा विचार करता येईल.

९. प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हाला मिळणारा वेळ विचारात घेऊन त्याचा जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे उपयोग करा. कच्चे काम प्रश्नपत्रिकेवरील प्रत्येक पृष्ठावर दिलेल्या रिकाम्या चौकटीतच करावे.

१०. या प्रश्नपुस्तिकेत केंद्र संकेतांक, आसन क्रमांक व कच्चे काम याखेरीज अन्य काहीही लिहू नका.

001. Mass of a block of metal is 10 kg and its dimensions are, length 50 cm, breadth 10 cm and height 20 cm (see fig.). If the metal block is placed on the table, find out the difference kept like wise ABCD and BCFG of the forces.





(1) 980 Pa

(2) 4900 Pa

(3) 3920 Pa

(4) 1960 Pa

002. Select the incorrect statement regarding 'irregular reflection' from the given statements below:

(a) Angles of incidence for parallel rays are not equal.

(b) Normals drawn to the surface are parallel.

(c) Reflected rays spread over a large surface.


(d) Laws of reflection are obeyed.


(1) (a) (2) (b)

(3) (c) (4) (d)

Space for Rough Work

001. एका धातूच्या ठोकळ्याचे वस्तुमान 10 kg असून त्याची लांबी 50 cm, रुंदी 10 cm व उंची 20 cm आहे. टेबलावर धातूचा ठोकळा आकृतीप्रमाणे ABCD व BCFG नुसार ठेवल्यास प्रयुक्त दाबातील फरक काढा.





(1) 980 Pa

(2) 4900 Pa

(3) 3920 Pa

(4) 1960 Pa

002. 'अनियमित परावर्तन' संबंधित खालील दिलेल्या विधानांतून चुकीचे विधान निवडा.

(a) समांतर किरणांचे आपाती कोन सारख्या मापाचे नसतात.

(b) पृष्ठ भागावर काढलेल्या स्तंभिका समांतर असतात.

(c) परावर्तित किरण विस्तृत पृष्ठभागावर विखूरतात.

(d) परावर्तनाचे नियम पाळले जातात.

(1) (a) (2) (b)

(3) (c) (4) (d)

कच्च्या कामासाठी फक्त

003. When a gas sphere contracts, its temperature increases. This happens because of transformation of its gravitational potential energy into _____ energy.

(1) Light (2) Sound

(3) Electric (4) Heat

004. Match the temperatures (given in column 'B') with the examples in column A; using correct alternative given below :

Column 'A' (Example)	Column 'B' (Temperature)
i. Temperature of human body	(a) 212° F
ii. Room temperature	(b) 234.35 k
iii. Freezing point of Mercury	(c) 72° F
iv. Boiling point of Water	(d) 37° C

(1) i - d, ii - c, iii - b, iv - a

(2) i - c, ii - b, iii - a, iv - d

(3) i - b, ii - a, iii - d, iv - c

(4) i - a, ii - d, iii - c, iv - b

005. Complete the statement using correct option given below :

When sound wave propagates from one place to other in air then _____

(1) air particles move in direction of sound wave.

(2) compression and rarefaction created remain constant.

(3) energy moves in direction of sound wave.

(4) changes in air pressure do not occur.

Space for Rough Work

003. जेव्हा वायुगोल आकुंचित होतो, त्याचे तापमान वाढते. हे घडण्यामागील कारण, गुरुत्वीय स्थितीज ऊर्जेचे _____ उर्जेत रुपांतर होते.

(1) प्रकाश (2) ध्वनी

(3) विद्युत (4) उष्णता

004. दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा;

तापमानांच्या (स्तंभ 'B' मध्ये दिलेल्या) स्तंभ 'A' मधील उदाहरणांशी जोड्या जुळवा.

स्तंभ 'A' (उदाहरण)	स्तंभ 'B' (तापमान)
i. मानवी शरीराचे तापमान	(a) 212° F
ii. कक्ष तापमान	(b) 234.35 k
iii. पाऱ्याचा गोठण बिंदू	(c) 72° F
iv. पाण्याचा उत्कलन बिंदू	(d) 37° C

(1) i - d, ii - c, iii - b, iv - a

(2) i - c, ii - b, iii - a, iv - d

(3) i - b, ii - a, iii - d, iv - c

(4) i - a, ii - d, iii - c, iv - b

005. खाली दिलेल्या पर्यायांतून विधान पूर्ण करा.

जेव्हा ध्वनीचे हवेतून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रसारण होते, तेव्हा _____

(1) हवेचे कण ध्वनी तरंगाच्या दिशेने गतिमान होतात.

(2) निर्माण झालेले संपीडने आणि विरलने स्थिर राहतात.

(3) ऊर्जेचे स्थानांतरण ध्वनी तरंगाच्या दिशेने होते.

(4) हवेच्या दाबात फरक होत नाही.

कच्च्या कामासाठी फक्त

006. Match the voltage developed (column 'B') by the cell (column 'A'). Select correct option from given alternatives.

Cell (Column 'A')	Column 'B' (Voltage)
i. Dry cell	(a) 1.2 V
ii. Lead Acid cell	(b) Less than 1.2 V
iii. Ni-cd cell	(c) more than 2 V
	(d) 2 V

(1) i - d, ii - c, iii - b (2) i - a, ii - d, iii - b


(3) i - c, ii - b, iii - d (4) i - b, ii - d, iii - a

007. Two substances 'A' and 'B' have specific heats C and 3C respectively, they are given same amounts of heat. If their masses are $3x$ and $7x$, find ratio of increase in temperatures.

(1) 7 : 1 (2) 7 : 2

(3) 8 : 1 (4) 1 : 7

008. A metal tube of diameter 3 cm and length 28 cm. Through this tube reflection of light is observed as shown in diagram.



First reflection is observed at '4' cm inside the tube. Reflection is continued many times. Find the number of reflections inside the tube till light ray comes out.

(1) 8 (2) 7

(3) 6 (4) 5

Space for Rough Work

006. निर्माण होणाऱ्या विभवांतराशी (स्तंभ 'B') घटाशी (स्तंभ 'A') जोड्या जुळवा; योग्य पर्याय दिलेल्या पर्यायातून निवडा.

घट (स्तंभ 'A')	स्तंभ 'B'
i. कोरडा घट	(a) 1.2 V
ii. लेड–ॲसीड घट	(b) 1.2 V पेक्षा कमी
iii. Ni-cd घट	(c) 2 V पेक्षा जास्त
	(d) 2 V

(1) i - d, ii - c, iii - b (2) i - a, ii - d, iii - b


(3) i - c, ii - b, iii - d (4) i - b, ii - d, iii - a

007. 'A' आणि 'B' या दोन पदार्थांचा विशिष्ट उष्मा अनुक्रमे C व 3C आहे. त्यांना सारख्या प्रमाणात उष्मा दिला. जर त्यांची वस्तुमाने अनुक्रमे $3x$ व $7x$ असतील, तर त्यांच्या तापमान वाढीतील गुणोत्तराचे प्रमाण काढा.

(1) 7 : 1 (2) 7 : 2

(3) 8 : 1 (4) 1 : 7

008. 3 cm व्यासाच्या आणि 28 cm लांबीच्या धातूच्या नलीकेतून प्रकाशाच्या परावर्तन आकृतीत दाखविल्याप्रमाणे निरिक्षित केले.



नळीत पहिले परावर्तन 4 cm वर आढळून आले. परावर्तन पुन्हा-पुन्हा (अनेकवेळा) घडून येते. प्रकाश किरण नलीकेतून बाहेर पडेपर्यंत घडून येणाऱ्या परावर्तनांची संख्या काढा.

(1) 8 (2) 7

(3) 6 (4) 5

कच्च्या कामासाठी फक्त

009. Atmospheric pressure = _____

(1) $\frac{\text{mass of air}}{\text{volume of air}}$ (2) $\frac{\text{No. of air particles}}{\text{Area of surface}}$

(3) $\frac{\text{mass of air column}}{\text{volume of air column}}$ (4) $\frac{\text{Weight of air}}{\text{Area of surface}}$

010. Choose correct sequence of working of electric bell from the given options.

(a) circuit is completed (b) sound is produced


(c) current flows through circuit (d) coil becomes magnet

(e) current flow in circuit stops.

(1) a → c → d → b → e (2) b → d → c → e → a

(3) c → d → e → a → b (4) d → e → a → b → c

011. Observe the figure alongside. Select correct alternative for the labelling A,B,C and D from the given option below :



Lunar Eclipse

(1) A-Penumbra, B-Earth, C-Umbra, D-Moon

(2) A-Umbra, B-Penumbra, C-Moon, D-Earth

(3) A-Earth, B-Moon, C-Penumbra, D-Umbra

(4) A-Moon, B-Umbra, C-Earth, D-Penumbra

Space for Rough Work

009. वातावरणीय दाब = _____

(1) $\frac{\text{हवेचे वस्तुमान}}{\text{हवेचे आकारमान}}$

(2) $\frac{\text{हवेच्या कणांची संख्या}}{\text{पृष्ठभागाचे क्षेत्रफळ}}$

(3) $\frac{\text{हवेच्या स्तंभाचे वस्तुमान}}{\text{हवेच्या स्तंभाचे आकारमान}}$


(4) $\frac{\text{हवेचे वजन}}{\text{पृष्ठभागाचे क्षेत्रफळ}}$

010. दिलेल्या पर्यायांचा विद्युत घंटेच्या कार्याचा अचुक पर्याय निवडा.

(a) परिपथ पूर्ण होतो.
(b) ध्वनी निर्माण होतो
(c) परीपथातून विद्युतधारा वाहते.
(d) गुंडाळे चुंबक बनते.
(e) परिपथातील विद्युत प्रवाह थांबतो.

(1) a → c → d → b → e
(2) b → d → c → e → a
(3) c → d → e → a → b
(4) d → e → a → b → c

011. सोबतच्या आकृतीचे निरीक्षण करा. A, B, C आणि D चे नामनिर्देशन केलेला अचुक पर्याय दिलेल्या पर्यायातून निवडा.



चंद्रग्रहण

(1) A-उपच्छाया B-पृथ्वी C-प्रच्छाया D-चंद्र
(2) A-प्रच्छाया B-उपच्छाया C-चंद्र D-पृथ्वी
(3) A-पृथ्वी B-चंद्र C-उपच्छाया D-प्रच्छाया
(4) A-चंद्र B-प्रच्छाया C-पृथ्वी D-उपच्छाया

कच्च्या कामासाठी फक्त

012. Name the scientist who studied the inside of atom by scattering experiment.

(1) Niel Bhor
(2) Ernest Rutherford
(3) J.J. Thomson
(4) John Dalton

013. The unit dalton (u) is used to measure _____ .

(1) mass of atom
(2) mass of electron
(3) mass of proton
(4) mass of molecule

014. 22 carat gold is the mixture of which metals?

(1) Gold and mercury
(2) Gold & silver or copper
(3) Gold and aluminium
(4) Gold and magnesium

015. Which of the following is not a characteristic of CNG?

(1) burns easily
(2) cannot transport easily
(3) Easily control on burning process.
(4) The formation of CO_2 & H_2O is less.

016. The chromatography method is used for the following purpose _____ .

(1) To seperate the solution which is not miscible.
(2) To seperate solid particles from colloidal solution.
(3) To purify impure solution.
(4) To seperate two or more substances from the solution.

Space for Rough Work

012. अणूच्या अंतरंगाचा अभ्यास करण्यासाठी विकिरण प्रयोग कोणत्या शास्त्रज्ञाचा आहे?

(1) नील्स बोर
(2) अर्नेस्ट रुदरफोर्ड
(3) जे.जे. थॉमसन
(4) जॉन डाल्टन

013. 'डाल्टन' (u) हे एकक कशाच्या मोजमापासाठी वापरतात?

(1) अणु वस्तुमान
(2) इलेक्ट्रॉन वस्तुमान
(3) प्रोटॉनचे वस्तुमान
(4) रेणू वस्तुमान

014. बावीस कॅरेट सोने हे कोणत्या धातूंचे संमिश्र असते?

(1) सोने व पारा
(2) सोने व चांदी किंवा तांबे
(3) सोने व अल्युमिनिअम
(4) सोने व मॅग्नेशिअम

015. पुढीलपैकी कोणते CNG चे वैशिष्ट्य नाही?

(1) सहज पेट घेतो
(2) सहज वाहून नेता येत नाही
(3) सहज ज्वलनावर नियंत्रण करता येते.
(4) कमी प्रमाणात CO_2 व H_2O तयार होते.

016. रंजकद्रव्य पृथक्करण पद्धती पुढीलपैकी कशासाठी वापरतात?

(1) एकमेकांत न मिसळणारे द्रव वेगळे करण्यासाठी
(2) कलील द्रावणांतील स्थायू कण वेगळे करण्यासाठी
(3) अशुद्ध द्रव शुद्ध करण्यासाठी
(4) एकाच द्रावणातील 2 किंवा अधिक विरघळलेले पदार्थ वेगळे करण्यासाठी

कच्च्या कामासाठी फक्त

017. Who has given the formula ($2n^2$) to indicate the maximum number of electrons present in a particular orbit?

(1) John Dalton
(2) J.J. Thomson
(3) Chadwick
(4) Niel's Bohr

018. Identify the molecular formula of sal - ammonia from the following

(1) $Na_2 CO_3$
(2) $NaHCO_3$
(3) $NH_4 C1$
(4) $Na_2 SO_4$

019. Name the acid present in curd.

(1) Lactic acid
(2) Acetic acid
(3) Citric acid
(4) Tartaric acid

020. In which atomic research centre the first Indian atomic power station 'Apsara' located?

(1) Kakarapar
(2) Chennai
(3) Rajasthan
(4) Mumbai

021. Salinity of Dead Sea is _____ .

(1) 3.8%
(2) 7.9%
(3) 3.5%
(4) 33.7%

022. Identify the different metal from the following

(1) Fe
(2) Al
(3) Cu
(4) Ga

Space for Rough Work

017. अणुच्या विशिष्ट कवचात जास्तीत जास्त किती इलेक्ट्रॉन असू शकतात यासाठीचे $2n^2$ हे सूत्र पुढीलपैकी कोणी प्रतिपादीत केलेले आहे?

(1) जॉन डाल्टन
(2) जे.जे. थॉमसन
(3) चॅडवीक
(4) नील्स बोर

018. नवसागराचे रेणूसुत्र पुढीलपैकी कोणते आहे?

(1) $Na_2 CO_3$
(2) $NaHCO_3$
(3) $NH_4 Cl$
(4) $Na_2 SO_4$

019. दह्यामध्ये कोणते आम्ल असते?

(1) लॅक्टीक आम्ल
(2) ॲसेटीक आम्ल
(3) सायट्रीक आम्ल
(4) टार्टारिक आम्ल

020. भारतातील पहिली अणुभट्टी 'अप्सरा' कोणत्या अणुसंशोधन केंद्रात आहे?

(1) काक्रापार
(2) चेन्नई
(3) राजस्थान
(4) मुंबई

021. मृत समुद्राची क्षारता (पाण्यातील क्षारांचे द्रावण) किती आहे?

(1) 3.8%
(2) 7.9%
(3) 3.5%
(4) 33.7%

022. पुढीलपैकी वेगळा धातू ओळखा –

(1) Fe
(2) Al
(3) Cu
(4) Ga

कच्च्या कामासाठी फक्त

023. Identify Incorrect Statement.

(1) Phosphorus - Conversion of light energy into chemical energy

(2) Magnesium - Production of chlorophyll

(3) Potassium - Important component of proteins, chlorophyll and cytoplasm

(4) Zinc - Production of hormones and their intermediates

024. Food is made alkaline by _____ .

(1) Bile Juice (2) Pancreatic Juice


(3) Intestinal Juice (4) Gastric Juice

025. National Institute of Virology _____ is involved in research on viruses.

(1) Mumbai (2) Pune

(3) Chennai (4) Delhi

026. Identify 'Hypha' from the following figure.



(1) A (2) B

(3) C (4) D

Space for Rough Work

023. पुढीलपैकी अयोग्य विधान ओळखा.

(1) फॉस्फरस – प्रकाश ऊर्जेचे रासायनिक उर्जेत रुपांतर

(2) मॅग्नेशियम – हरितद्रव्य निर्माण करणे

(3) पोटॅशियम – प्रथिने, हरितद्रव्ये व पेशीद्रव यांच्यातील महत्वाचा घटक आहे.

(4) झिंक – संप्रेरके व त्यांतील घटक निर्माण करणे

024. अन्न आम्लरियुक्त करणे हे कार्ये कोणत्या पाचकरसाचे आहे?

(1) पित्तरस (2) स्वादुरस


(3) आंत्ररस (4) जाठररस

025. राष्ट्रीय विषाणू संस्था _____ ही विषाणु संदर्भातील संशोधनाचे कार्य करते.

(1) मुंबई (2) पुणे

(3) चेन्नई (4) दिल्ली

026. खालील आकृतीतील भूस्तरिका ओळखा



(1) A (2) B

(3) C (4) D

कच्च्या कामासाठी फक्त

027. Due to various metabolic activities in the cell, organic waste is generated, this waste is digested by _____ .

(1) Golgi complex
(2) Mitochondria
(3) Vacuoles
(4) Lysosomes

028. _____ has the largest number of diabetes patients in the world.

(1) Japan
(2) America
(3) India
(4) China

029. Find the odd pair.

(1) Tuberculosis - Microbacterium
(2) Diarrhoea - Hepatitis
(3) Cholera - Vibrio Cholerae
(4) Typhoid - Salmonella

030. Fire caused by solid substances like wood, clothes, coal etc. comes under _____ type of fire.

(1) Class A fire
(2) Class B fire
(3) Class C fire
(4) Class E fire

031. _____ Cells mitochondria are absent.

(1) White Blood Cells
(2) Platelets
(3) Nerve Cells
(4) Red Blood Corpuscles

Space for Rough Work

027. पेशीत घडणाऱ्या चयापचय क्रियांमध्ये जे टाकाऊ पदार्थ तयार होतात, त्यांची विल्हेवाट लावणारी संस्था म्हणजे .....

(1) गॉल्गी संकुल
(2) तंतुकणिका
(3) रिक्तिका
(4) लयकारिका

028. जगातील सर्वाधिक मधुमेहाचे रुग्ण कोठे आढळतात?

(1) जपान
(2) अमेरिका
(3) भारत
(4) चीन

029. खालील जोड्यांपैकी विसंगत जोडी ओळखा.

(1) क्षय – मायक्रोबॅक्टेरिअम ट्युबरक्युली
(2) अतिसार – हेपॅटीटीस
(3) पटकी – व्हिब्रियो कॉलरी
(4) विषमज्वर – सालमोनेला टायफी

030. लाकूड, कपडे, कोळसा इ. घनरुप पदार्थापासून लागणारी आग कोणत्या आगीच्या प्रकारात येते?

(1) अ वर्गीय आग
(2) ब वर्गीय आग
(3) क वर्गीय आग
(4) इ वर्गीय आग

031. खालीलपैकी कोणत्या पेशीत तंतूकणिका नसतात?

(1) श्वेत रक्तपेशी
(2) रक्तपट्टीका
(3) चेतापेशीत
(4) लोहितरक्तकणिका

कच्च्या कामासाठी फक्त

032. Blood Group _____ was discovered by Decastello and Sturli.

(1) A (2) B

(3) AB (4) O

033. In case of a healthy person there are _____ beats of heart per minute.

(1) 79 (2) 72

(3) 74 (4) 75

034. The Sanctuary at Bharatpur is world famous for _____

(1) aquatic birds (2) elephants

(3) Tiger (4) lion

035. Instrument sphygmomanometer is used to measure _____.

(1) Air pressure (2) Blood pressure

(3) Atmospheric pressure (4) Water pressure

036. Which of the following is not feature of Civil Disobedience Movement?

(1) It is a nationwide movement

(2) Women also took part in a large number

(3) People's protest was armed protest

(4) This movement was based on complete non violence.

037. Which method or way Gandhiji used to give justice to farmers in his first war of independence in India?

(1) Hartal (2) Satyagraha

(3) Hunger strike (4) Strike

Space for Rough Work

032. .....या रक्तगटाचा शोध डिकास्टेलो आणि स्टर्ली यांनी लावला.

(1) A (2) B

(3) AB (4) O

033. निरोगी मानवाच्या हृदयाचे दर मिनिटास ..... ठोके पडतात.

(1) 79 (2) 72

(3) 74 (4) 75

034. भरतपूर अभयारण्य कशासाठी जग प्रसिद्ध आहे?

(1) पाणपक्षी (2) हत्ती

(3) वाघ (4) सिंह

035. स्पिग्मोमॅनोमीटर या यंत्राने खालीलपैकी काय मोजतात?

(1) हवेचा दाब (2) रक्तदाब

(3) वातावरणीय दाब (4) पाण्याचा दाब

036. सविनय कायदेभंग चळवळीच्या वैशिष्ट्याशी विसंगत पर्याय लिहा.

(1) देशव्यापी चळवळ

(2) स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

(3) जनतेने हिंसक मार्गाने प्रतिकार केला

(4) चळवळ पूर्णपणे अहिंसक पद्धतीने पार पडली.

037. भारतातील पहिला लढा यशस्वी करून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी महात्मा गांधी यांनी कोणता मार्ग अवलंबला?

(1) हरताळ (2) सत्याग्रह

(3) उपोषण (4) संप

कच्च्या कामासाठी फक्त

038. Which of the following statement is not related to Gopal Krishna Gokhale;

(1) He founded the servants of India Society

(2) Gopal Krishna Gokhale was the president of Indian National Congress session.

(3) He taught sacrifice of self interest.

(4) For the first time he pronounced the word 'Swaraj' from the stage of Indian National Congress Session.

039. Select the option that shows correct pairs of following:

I. Bal Hatya Pratibandhak Gruha	A) Maharshi Dhondo Keshav Karve
II. Seva Sadan Institute	B) Mahatma Phule
III. Sharada Sadan	C) Ramabai Ranade
IV. Anath Balikashram	D) Pandita Ramabai

(1) I - B, II - C, III - D, IV - A

(2) I - C, II - D, III - B, IV - A

(3) I - D, II - A, III - C, IV - B

(4) I - A, II - D, III - B, IV - C

040. Select the option that shows correct chronological order of following;

I. Treaty of Salbai

II. Introduced Dual Government system in Bengal

III. Pitt's India Act was passed

IV. Regulating Act

(1) IV, II, I, III

(2) III, I, IV, II

(3) I, III, II, IV

(4) II, IV, I, III

Space for Rough Work

038. गोपाळकृष्ण गोखले यांच्या कार्याशी संबंधित चूकीच्या विधानाचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) भारत सेवक समाजाची स्थापना

(2) राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष

(3) स्वार्थत्यागाची शिकवण दिली

(4) राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून 'स्वराज्य' शब्दाचा सर्वप्रथम उच्चार केला

039. योग्य जोड्या असलेला पर्याय क्रमांक लिहा.

I. बालहत्या प्रतिबंधक गृह	अ. महर्षी धोंडो केशव कर्वे
II. सेवासदन	ब. महात्मा फुले
III. शारदासदन	क. रमाबाई रानडे
IV. अनाथ बालिकाश्रम	ड. पंडिता रमाबाई

(1) I - ब, II - क, III - ड, IV - अ

(2) I - क, II - ड, III - ब, IV - अ

(3) I - ड, II - अ, III - क, IV - ब

(4) I - अ, II - ड, III - ब, IV - क

040. खालील घटनांचा योग्य कालानुक्रमे असलेला पर्याय लिहा.

I. सालबाईचा तह

II. बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था

III. पिटचा भारतविषयक कायदा मंजूर

IV. रेग्युलेटिंग ॲक्ट

(1) IV, II, I, III (2) III, I, IV, II

(3) I, III, II, IV (4) II, IV, I, III

कच्च्या कामासाठी फक्त

041. Who was deorted by Portuguese Government for violating the ban, delivering a public speech at Madgaon?

(1) Dr. T. B. Kunha
(2) Govind Pansare
(3) Dr. Ram Manohar Lohiya
(4) Senapati Bapat

042. Which of the following plan included the provision that there will be equal number of members in Viceroy's Executive Council?

(1) Cabinet mission
(2) Wavel Plan
(3) Mountbatten Plan
(4) Cripps Plan

043. Person shown in the picture is related to which of the following option?



(1) Established Bharat Mahila Parishad
(2) Established Arya Mahila Samaj
(3) Established Red Cross Society
(4) Wrote book named ''Stri-Purush Tulana''

044. Who was the chief of the organisation called ''Anushilan Samiti''?

(1) Rash Behari Bose
(2) Aurobindo Ghosh
(3) Khudiram Bose
(4) Barindrakumar Ghosh

045. What was the name of the battalion that was formed by Rash Behari Bose with the help of Captain Mohan Singh?

(1) Azad Hind Sena
(2) Azad Hind Government
(3) Toofan Sena
(4) Lal Sena

046. Who was the last Governor General as well as first Viceroy of India?

(1) Lord Wellesley
(2) Lord Mountbatten
(3) Lord Canning
(4) Lord Wavell

Space for Rough Work

041. बंदीहुकूम मोडून मडगाव येथे भाषण केल्याबद्दल पोर्तुगीज सरकारने हद्दपार केलेले नेते .....

(1) डॉ. टी.बी. कुन्हा (2) गोविंद पानसरे

(3) डॉ. राममनोहर लोहिया (4) सेनापती बापट

042. व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात हिंदू व मुस्लीम सदस्यांची संख्या समसमान राहील अशी तरतूद कोणत्या योजनेत होती?

(1) त्रिमंत्री योजना (2) वेव्हेल योजना

(3) माऊंटबॅटन योजना (4) क्रिप्स योजना

043. चित्रामधील व्यक्ती खालीलपैकी कोणत्या घटनेशी संबंधित आहे त्याचा योग्य पर्याय क्रमांक ओळखून लिहा.



(1) भारत महिला परिषदेची स्थापना केली

(2) आर्य महिला समाजाची स्थापना केली

(3) रेडक्रॉस सोसायटीची स्थापना केली

(4) स्त्री-पुरुष तुलना ग्रंथ लिहिला.

044. 'अनुशीलन समिती' या क्रांतिकारी संघटनेचे प्रमुख –

(1) रासबिहारी बोस (2) अरविंद घोष

(3) खुदीराम बोस (4) बारींद्रकुमार घोष

045. कॅ. मोहनसिंग यांच्या मदतीने रासबिहारी बोस यांनी तयार केलेल्या पलटणीला दिलेले नाव .....

(1) आझाद हिंद सेना (2) आझाद हिंद सरकार

(3) तुफान सेना (4) लाल सेना

046. भारताचा शेवटचा गव्हर्नर जनरल व पहिला व्हाईस रॉय .....

(1) लॉर्ड वेलस्ली (2) लॉर्ड माऊंटबॅटन

(3) लॉर्ड कॅनिंग (4) लॉर्ड वेव्हेल

कच्च्या कामासाठी फक्त

047. Which of the following is revolutionary event in the history of medieval India?

(1) Coronation of Shivaji Maharaj
(2) Agra visit of Shivaji Maharaj
(3) Shivaji Maharaj's Surat Campaign
(4) Shivaji Maharaj's Campaign of South.

048. Select correct statement;

(1) Dr. Babasaheb Ambedkar started a weekly Mooknayak
(2) Shatapatre written by Lokahitwadi in weekly Prabhakar.
(3) Vishnushastri Chiplunkar wrote in the Monthly Nibandhamala
(4) In pre-independence period monthly Deenbandhu acted as important source of awakening the mind of the people.

049. To whom did Shivaji Maharaj told not to neglect his medicine or treatment on any account?

(1) Kanhoji Angre
(2) Yesaji Kank
(3) Kanhoji Jedhe
(4) Madari Mehatar

050. The _____ looked after the storage of foodgrains and the maintenance of war material on the fort.

(1) Sabnis
(2) Karkhanis
(3) Shiledar
(4) Bargir

051. _____ was the President of Constituent Assembly.

(1) Dr. Rajendra Prasad
(2) Pandit Jawaharlal Nehru
(3) Dr. Babasaheb Ambedkar
(4) Sardar Vallabhbhai Patel

Space for Rough Work

047. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील क्रांतीकारी घटना .....

(1) शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक
(2) शिवाजी महाराजांची आग्रा भेट
(3) शिवाजी महाराजांची सुरतेवर स्वारी
(4) शिवाजी महाराजांची दक्षिण मोहीम

048. योग्य विधानांचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक साप्ताहिक सुरु केले.
(2) लोकहितवादीनी प्रभाकर या साप्ताहिकातून शतपत्रे लिहिली.
(3) विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला पाक्षिक्ततून लेखन केले.
(4) स्वातंत्र्यपूर्व काळात दीनबंधु या मासिकाने लोकजागृती केली.

049. 'औषधोपचारात कोणत्याही प्रकारची हयगय करु नये' असे शिवाजी महाराजांनी कोणास सांगितले?

(1) कान्होजी आंग्रे
(2) येसाजी कंक
(3) कान्होजी जेधे
(4) मदारी मेहत्तर

050. किल्ल्यावर धान्याची कोठी आणि युद्ध साहित्याची व्यवस्था पाहण्यासाठी ..... हा अधिकारी असे.

(1) सबनीस
(2) कारखानीस
(3) शिलेदार
(4) बारगीर

051. भारतीय संविधान अध्यक्ष ..... होते.

(1) डॉ. राजेंद्र प्रसाद
(2) पं. जवाहरलाल नेहरु
(3) बाबासाहेब आंबेडकर
(4) सरदार वल्लभभाई पटेल

कच्च्या कामासाठी फक्त

052. _____ is a distinct characteristic of parliamentary system of government.

(1) Powerful opposition party
(2) Collective responsibility
(3) Totalitarianism
(4) Centralisation of Power

053. Who has been given power to establish a High Court in each Constituent State?

(1) Governor
(2) Election Commission
(3) Legislative Council
(4) Parliament

054. What is the minimum age for contesting Lok Sabha Election?

(1) 18
(2) 21
(3) 25
(4) 30

055. Who appoints the Chief Election Commissioner?

(1) Chief Justice
(2) President
(3) Prime Minister
(4) Governor

056. What is distance between Moon and Earth during perigee?

(1) 4,56,000 km
(2) 3,56,000 km
(3) 4,07,000 km
(4) 3,07,000 km

057. We experienced _____ everyday due to Earth's rotation.

(1) Sunrise and Sunset
(2) Lunar eclipse and solar eclipse
(3) Underground current and Earth's rotation
(4) Rainfall and change in temperature.

Space for Rough Work

052. संसदीय शासन पद्धतीचे ..... हे खास वैशिष्ट्य आहे.

(1) प्रबळ विरोधी पक्ष (2) सामुहिक जबाबदारी

(3) एकाधिकारशाही (4) सत्तेचे केंद्रिकरण

053. भारतीय संघराज्यातील प्रत्येक घटक राज्यासाठी एक उच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार कोणाला देण्यात आला आहे?

(1) राज्यपालांना (2) निवडणूक आयोगाला

(3) विधीमंडळाला (4) संसदेला

054. लोकसभेची निवडणूक लढवणाऱ्या व्यक्तीने वयाची कमीतकमी किती वर्षे पूर्ण केलेली असावी लागतात?

(1) 18 (2) 21

(3) 25 (4) 30

055. मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक कोण करते?

(1) सर न्यायाधीश (2) राष्ट्रपती

(3) प्रधानमंत्री (4) राज्यपाल

056. चंद्र पृथ्वीभोवती प्रदक्षिणा करताना उपभू स्थिती वेळी चंद्र आणि पृथ्वीमधील सुमारे .....अंतर असते.

(1) 4,56,000 किमी (2) 3,56,000 किमी

(3) 4,07,000 किमी (4) 3,07,000 किमी

057. पृथ्वीच्या परिवलनामुळे कोणत्या नैसर्गिक घटकांचा अनुभव आपल्याला दररोज मिळतो?

(1) सूर्योदय आणि सूर्यास्त

(2) चंद्रग्रहण व सूर्यग्रहण

(3) भूमिगत प्रवाह आणि पृथ्वीची चक्रीवात


(4) पावसाचे प्रमाण व तापमानातील बदल

कच्च्या कामासाठी फक्त

058. Average depth of ocean is around _____

(1) 2700 metres
(2) 4700 metres
(3) 3600 metres
(4) 3700 metres

059. Observe the figure and select the option that shows Geo-Magnetic Axis;



(1) B
(2) A
(3) D
(4) C

060. In order to improve the fertility of the soil, For how many seasons farmer does not use a part of his agricultural land?

(1) One to Five
(2) One to Four
(3) One to Two
(4) One to Three

061. What happen with the moisture holding capacity of air and to the proportion of moisture present in it at a certain temperature? Select correct option;

(1) becomes equal
(2) reduced
(3) increased
(4) keep changing


Space for Rough Work

058. महासागरांची सरासरी खोली सुमारे ..... आहे.

(1) 2700 मीटर (2) 4700 मीटर

(3) 3600 मीटर (4) 3700 मीटर

059. आकृतीचे निरीक्षण करून आकृतीत 'भूचुंबकीय आस' कोणत्या इंग्रजी अक्षराने दर्शविले आहे?



(1) B (2) A

(3) D (4) C

060. जमिनीचा कस वाढवण्यासाठी शेतकरी किती हंगाम शेतजमिनीचा काही भाग वापरत नाहीत?

(1) एक ते पाच (2) एक ते चार

(3) एक ते दोन (4) एक ते तीन

061. हवेची बाष्पधारण क्षमता आणि बाष्पाचे प्रमाण एका विशिष्ट तापमानात कसे असते?

(1) समान असते (2) कमी असते

(3) जास्त असते (4) बदलते

कच्च्या कामासाठी फक्त

062. Which of the following is part of 'Productive Population'?

(1) People taking education

(2) People active in service and business

(3) Students learning in school

(4) Old and retired people

063. Which of the following is not influence of Horizontal Ocean Current?

(1) Change in temperature (2) Increase speed

(3) Density (4) Discharge of water

064. Which of the following is example of Medium type of Industry?

(1) Sugar factory
(2) Bakery
(3) Jaggery making
(4) Making of earthern pots.

065. Which of the following is not needed for field trip?

(1) Gold ring (2) Pencil
(3) Notebook (4) Camera

066. The same unit used for the figures on left hand side is also used for the figures on _____ hand side.

(1) Down (2) Up
(3) Left (4) Right

Space for Rough Work

062. कार्यक्षम लोकसंख्या गट म्हणजे कोणत्या वयोगटातील व्यक्ती असतात?

(1) शिक्षण घेत असलेले लोक
(2) नोकरी व व्यवसायात व्यस्त असलेले लोक
(3) शाळेत शिकणारे विद्यार्थी
(4) वृद्ध व निवृत्त लोक

063. क्षितिज समांतर सागरी प्रवाहाचा प्रमुख प्रभाव काय नाही?

(1) तापमान बदल
(2) वेग वाढ
(3) घनता
(4) पाण्याचा विसर्ग

064. खालीलपैकी कोणत्या उद्योगाचा समावेश मध्यम उद्योगात होतो?

(1) साखर कारखाना
(2) बेकरी
(3) गुऱ्हाळ
(4) मातीची भांडी बनवणे

065. क्षेत्रभेटीसाठी खालील कोणती वस्तू आवश्यक नाही?


(1) सोन्याची अंगठी
(2) पेन्सिल
(3) नोंदवही
(4) कॅमेरा

066. नकाशाच्या अंक प्रमाणात गुणोत्तराच्या डाव्या बाजूला अंकासाठी जे एकक आपण विचारात घेतो तेच एकक ..... कडील अंकासाठी वापरायचे असते.

(1) खालच्या
(2) वरच्या
(3) डाव्या
(4) उजवी

कच्च्या कामासाठी फक्त

067. Study the given figure and answer the question; Which letter shows trough in the structure of wave?



(1) M
(2) N
(3) P
(4) G

068. Given below are layers of interior of Earth and its density, select option showing correct pairs;

'A' group	'B' group
1) Average density of Mantle	A) 2.65 to 2.90 gm/cm^3
2) Density of Outer Core	B) 4.5 gm/cm^3
3) Density of Oceanic Crust	C) 9.8 gm/cm^3
4) Density of Continental Crust	D) 2.9 gm/cm^3


(1) 1-D, 2-A, 3-C, 4-B
(2) 1-B, 2-C, 3-D, 4-A
(3) 1-C, 2-A, 3-B, 4-D
(4) 1-A, 2-C, 3- B, 4-D

069. Which of the following current flows near east coast of Africa?

(1) Benguela
(2) Brazil
(3) Somali
(4) Canary

Space for Rough Work

067. आकृतीचे निरीक्षण करून उत्तर ओळखा. आकृतीत लाटेच्या रचनेतील 'द्रोणी' भाग इंग्रजीतील कोणत्या अक्षराने दर्शविला आहे?



(1) M
(2) N
(3) P
(4) G

068. खालीलपैकी भूअंतर्गत भाग व त्यांची घनता यांचा अचूक जोडीचा पर्याय कोणता?

'अ' गट	'ब' गट
1) प्रावरणाची सरासरी घनता	A) 2.65 ते 2.90 ग्रॅम/घसेमी
2) बाह्य गाभ्याची घनता	B) 4.5 ग्रॅम/घसेमी
3) महासागरीय कवचाची घनता	C) 9.8 ग्रॅम/घसेमी
4) भूखंडीय कवच	D) 2.9 ग्रॅम/घसेमी

(1) 1-D, 2-A, 3-C, 4-B
(2) 1-B, 2-C, 3-D, 4-A
(3) 1-C, 2-A, 3-B, 4-D
(4) 1-A, 2-C, 3- B, 4-D

069. खालीलपैकी कोणता प्रवाह आफ्रिकेच्या पूर्व किनारपट्टी जवळून जातो?

(1) बेंग्युला
(2) ब्राझील
(3) सोमाली
(4) कॅनरी

कच्च्या कामासाठी फक्त

070. If population of any region is 15000 and area of same region is 3000 sq.km, What can be the density of the population?

(1) 10 (2) 15

(3) 04 (4) 05

071. Marked price is Rs. 1700 and selling price is 1540 Rs. then rebate is _____ .

(1) 240 ₹ (2) 140 ₹


(3) 260 ₹ (4) 160 ₹

072. Reduced form of $\frac{m^2-n^2}{(m+n)^2}$ = ?

(1) $\frac{m-n}{m+n}$ (2) $\frac{m+n}{m-n}$

(3) $\frac{m-n}{m^2+n^2}$ (4) $\frac{m+n}{m^2+n^2}$

073. ABCD is a rectangle. AC = $5\sqrt{3}$ cm, AB = $5\sqrt{2}$ cm then AD = ?



(1) $5\sqrt{2}$ cm (2) 5 cm

(3) $25\sqrt{2}$ cm (4) 25 cm

Space for Rough Work

070. खालील उदाहरणाचा विचार करताना एखाद्या प्रदेशाची लोकसंख्या 15000 आहे तर त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ 3000 चौ.किमी तर त्या प्रदेशाच्या लोकसंख्येची घनता प्रति चौ. किमीला किती येईल?

(1) 10 (2) 15

(3) 04 (4) 05

071. जर छापील किंमत 1700 ₹ व विक्री किंमत 1540 ₹ असेल तर सूट किती?

(1) 240 ₹ (2) 140 ₹


(3) 260 ₹ (4) 160 ₹

072. $\frac{m^2-n^2}{(m+n)^2}$ चे संक्षिप्त रूप कोणते?

(1) $\frac{m-n}{m+n}$ (2) $\frac{m+n}{m-n}$

(3) $\frac{m-n}{m^2+n^2}$ (4) $\frac{m+n}{m^2+n^2}$

073. सोबतच्या आकृतिमध्ये □ ABCD आयत आहे. तसेच AC = $5\sqrt{3}$ सेमी, AB = $5\sqrt{2}$ सेमी तर बाजू AD ची लांबी किती?




(1) $5\sqrt{2}$ सेमी (2) 5 सेमी

(3) $25\sqrt{2}$ सेमी (4) 25 सेमी

कच्च्या कामासाठी फक्त

074. 'O' is centre of circle and OD = 10 cm. OM = 6 cm then length of chord AB = ?




(1) 8 cm

(2) 16 cm

(3) 10 cm

(4) 4 cm

075. Perimetre of the adjoined fig is _____ .



(1) 90 m

(2) 80 m

(3) 45 m

(4) 70 m

076. $-7 \square -2$ use correct sign from given below

(1) $>$ (2) $<$

(3) $\cong$ (4) $=$


077. Simplified form of $(a + b)^3 - (a - b)^3$ = ?

(1) $2a^3 + 2b^3$ (2) $2a^3 + 6ab^2$

(3) $2b^3 + 6a^2b^2$ (4) $2b^3 + 6a^2b$

Space for Rough Work

074. आकृतीमध्ये 'O' हा वर्तुळाचा केंद्रबिंदू असून OD =10 सेमी, OM = 6 सेमी तर जीवा AB ची लांबी किती?




(1) 8 सेमी

(2) 16 सेमी

(3) 10 सेमी

(4) 4 सेमी

075. सोबतच्या आकृतीची परिमिती किती?



(1) 90 मी

(2) 80 मी

(3) 45 मी

(4) 70 मी

076. $-7 \square -2$ खालीलपैकी योग्य चिन्ह वापरा.

(1) $>$ (2) $<$

(3) $\cong$ (4) $=$

077. $(a + b)^3 - (a - b)^3$ चे सोपेरूप खालीलपैकी कोणते?

(1) $2a^3 + 2b^3$ (2) $2a^3 + 6ab^2$

(3) $2b^3 + 6a^2b^2$ (4) $2b^3 + 6a^2b$

कच्च्या कामासाठी फक्त

078. If $n \propto m$ and when $m = 3$ then n is $= 12$ so find value of 'm' when $n = 20$.

(1) 100 (2) 5

(3) 36 (4) 60

079. My friend's age is 5 years more by half of my age. If my age is x years then his age will be = ?

(1) $\frac{2}{x} + 5$

(2) $x + 5$

(3) $2x + 5$

(4) $\frac{x}{2} + 5$

080. Reduced form of $40\ m^2 \div 30\ m^3$ is _____ .

(1) $\frac{4}{3m}$

(2) $\frac{4m}{3}$

(3) $\frac{3}{4m}$

(4) $\frac{4m^2}{3}$

081. Value of $\sqrt[3]{0.125}$ = ?

(1) 125 (2) 0.125

(3) 0.5 (4) 5

Space for Rough Work

078. जर $n \propto m$ आणि $m = 3$ असताना $n = 12$, तर $n = 20$, असताना m ची किंमत कीती?

(1) 100 (2) 5

(3) 36 (4) 60

079. माझ्या मित्राचे वय, माझ्या वयाच्या निम्म्यापेक्षा 5 वर्षे जास्त आहे. माझे वय x वर्षे आहे तर मित्राचे वय किती वर्षे आहे?

(1) $\frac{2}{x} + 5$

(2) $x + 5$

(3) $2x + 5$

(4) $\frac{x}{2} + 5$

080. $40\ m^2 \div 30\ m^3$ चे संक्षिप्तरूप खालीलपैकी कोणते?

(1) $\frac{4}{3m}$

(2) $\frac{4m}{3}$

(3) $\frac{3}{4m}$

(4) $\frac{4m^2}{3}$

081. $\sqrt[3]{0.125}$ ची किंमत खालीलपैकी कोणती?

(1) 125 (2) 0.125


(3) 0.5 (4) 5

कच्च्या कामासाठी फक्त

082. Principle of Rs. 5000 amounts to Rs. 6655 in 3 years at compound interest hence rate of interest is = ?


(1) 11%
(2) 10%
(3) 5%
(4) 15%

083. Line m || lines n and 'P' is transversal find value of x



(1) 135°
(2) 90°
(3) 45°
(4) 40°

084. State by which correspondence the triangles shown below are congruent.



(1) PQR ↔ TUS
(2) PQR ↔ UTS
(3) PQR ↔ UST
(4) PQR ↔ STU

085. $(x - 20)°$ and $(x + 30)°$ are complementary angles hence value of x = ?


(1) 40°
(2) 50°
(3) 85°
(4) 80°

Space for Rough Work

082. 5000 रुपये रकमेचे 3 वर्षांची चक्रवाढ व्याजाने 6655 रूपये रास होते, तर व्याजाचा दर किती?


(1) 11%
(2) 10%
(3) 5%
(4) 15%

083. शेजारील आकृतीत जर रेषा m || रेषा n असेल आणि p ही त्यांची छेदिका असेल तर x ची किंमत किती?



(1) 135°
(2) 90°
(3) 45°
(4) 40°

084. पुढील त्रिकोण कोणत्या एकास एक संगतीनुसार एकरुप होतील?



(1) PQR ↔ TUS
(2) PQR ↔ UTS
(3) PQR ↔ UST
(4) PQR ↔ STU

085. $(x - 20)°$ व $(x + 30)°$ हे एकमेकांचे कोटिकोन आहेत तर x ची किंमत किती?

(1) 40°
(2) 50°
(3) 85°
(4) 80°

कच्च्या कामासाठी फक्त

086. Value of expression $72 \div 6 + 2 \times 2 - 2 = ?$

(1) 30 (2) 9

(3) 26 (4) 14

087. A cuboid shape ware house has dimension 3 m × 2 m × 2 m. How many maximum no. of cubes having each side 20 cms can be stored in it.

(1) 150 (2) 750

(3) 1500 (4) 15

088. In which of the following bardiagram height of all bars are 100 units.

(1) Joint bardiagram (2) Divided bardiagram

(3) Percentage bardiagram (4) Pie-diagram

089. Orthocentre of an acute angled Triangle is in/on _____ of Triangle.

(1) Interior (2) Side

(3) Exterior (4) Vertex

090. Area of Rhombus is 180 cm^2. One of its diagonal is 24 cm. Find length of the other diagonal.

(1) 24 cm (2) 21 cm

(3) 12 cm (4) 15 cm

Space for Rough Work

086. $72 \div 6 + 2 \times 2 - 2$ या पदावलीची किंमत किती?

(1) 30 (2) 9

(3) 26 (4) 14

087. एका इष्टिकाचिती आकाराच्या गोदामाची लांबी 3 मी, रुंदी 2 मी व उंची 2 मी आहे. या गोदामात 20 सेमी बाजू असलेली घनाकृती खोकी जास्तीत जास्त किती मावतील?

(1) 150 (2) 750

(3) 1500 (4) 15

088. खालीलपैकी कोणत्या स्तंभालेखामध्ये सर्व स्तंभांची उंची 100 एकक असते?

(1) जोड स्तंभालेख (2) विभाजीत स्तंभालेख

(3) शतमान स्तंभालेख (4) वृत्तालेख

089. लघुकोन त्रिकोणाचा लंबसंपात बिंदू हा त्या त्रिकोणाच्या ..... असतो.

(1) अंतभार्गात (2) बाजूवर

(3) बाह्यभागात (4) शिरोबिंदूवर

090. एका समभुज चौकोनाचे क्षेत्रफळ 180 चौसेमी आहे. त्याच्या एका कर्णाची लांबी 24 सेमी असल्यास दुसऱ्या कर्णाची लांबी किती?

(1) 24 सेमी (2) 21 सेमी

(3) 12 सेमी (4) 15 सेमी

कच्च्या कामासाठी फक्त

Space for Rough Work

Space for Rough Work

Space for Rough Work